महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ २२ जानेवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २०७ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये



### सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनिषा म्हैसकर यांच्या उपस्थितीत

## मलंगगड फ्युनिक्युलर रेल्वे प्रकल्पाची पाहणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. २१

**अंबरनाथ :** मलंगगड परिसर हे धार्मिक आणि पर्यटन दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असून, दरवर्षी येथे लाखो भाविक दर्शनासाठी येतात. या प्रकल्पाअंतर्गत सुरक्षित, सुलभ, वेळेची बचत करणारी आणि आधुनिक वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देणे हे मुख्य उद्दिष्ट ठरले आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग आणि लहान मुलांसह येणाऱ्या कुटुंबांसाठी हा प्रकल्प मोठा दिलासा देणारा आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव श्रीमती मनिषा म्हैसकर यांच्या उपस्थितीत आज मलंगगडावरील फ्युनिक्युलर रेल्वे प्रकल्पाची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. पाहणीदरम्यान त्यांनी फ्युनिक्युलर रेल्वेने प्रवास करून प्रकल्पाची कार्यक्षमता अनुभवली. यावेळी आमदार किसन कथोरे यांनी "फ्युनिक्युलर रेल्वे प्रकल्पात अत्याधुनिक तंत्रज्ञान, उच्च दर्जाचे सुरक्षितता उपाय आणि पर्यावरणपूरक रचना यांचा समावेश आहे. या प्रकल्पामुळे मलंगगडाच्या ऐतिहासिक, धार्मिक आणि पर्यटन महत्त्वाला अनुरूप सुविधा राज्य शासनाने भाविकांसाठी उपलब्ध करून दिल्या आहेत, असे सांगितले. हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी राज्य शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि संबंधित अधिकाऱ्यांचे परिश्रम निश्चितच कौतुकास्पद आहेत. भविष्यात मलंगगड परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि भाविकांच्या सोयीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न सातत्याने सुरू राहतील. असेही आमदार किसन कथोरे यांनी पुढे नमूद केले

# कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत मनसेचे शिवसेना-शिंदे गटाला समर्थन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. २१

**कल्याण डोंबिवली महापालिकेची निवडणुक शिंदेसेना आणि भाजपने एकत्र येऊन लढवली होती. ५४ जागा लढवून ५० जागा जिंकणाऱ्या भाजपच्या विजयाची टक्केवारी मोठी असल्याने सत्ता स्थापने शिंदे यांच्या पक्षाला भाजपची गरज लागेल असेच चित्र होते. आकड्यांचे हे गणित लक्षात घेऊन शिंदे यांनी मनसे आणि इतरांना एकत्र घेत भाजपचे महत्व कमी केले असल्याची चर्चा आता रंगली आहे.**

**ठाणे :** कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या निवडणुका भाजपसोबत युतीत लढलेल्या एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने आता महापालिकेतील सत्ता स्थापनेत भाजपचे अवलंबित्व कमी करण्याच्या दिशेने वेगाने हालचाली सुरू केल्या आहेत. एकूण १२२ जागा असलेल्या या महापालिकेत सत्ता स्थापनेसाठी ६२ नगरसेवकांचे समर्थन आवश्यक आहे.

कल्याण-डोंबिवली महापालिकेत शिंदे गट ५३ नगरसेवकांसह मोठा भाऊ ठरला असला, तरी ५० जागा मिळवणारा भाजपही फारसा मागे नाही. या पार्श्वभूमीवर मनसेच्या ५ नगरसेवकांचा पाठिंबा मिळविणाऱ्या शिंदे गटाने बहुमतापर्यंत पोहोचण्यासाठी आता काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचाही आधार घेण्याची तयारी सुरू केल्याची विश्वसनीय माहिती आहे. भाजपला सत्तेत सहभागी करून घेत असतानाच त्याचे महत्त्व कमी करण्याची ही खेळी असल्याची राजकीय चर्चा रंगू लागली आहे. दरम्यान, कल्याण-डोंबिवली महापालिकेतील शिंदे गट तसेच मनसेच्या नगरसेवकांनी बुधवारी कोकण आयुक्त कार्यालयात जाऊन आपापल्या पक्षांचे स्वतंत्र नगरसेवक गट स्थापन केले. त्यापूर्वी एकनाथ शिंदे यांचे पुत्र आणि कल्याणचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी मनसेचे स्थानिक नेते राजू पाटील यांची भेट घेत त्यांच्यासोबत सविस्तर चर्चा केली. या बैठकीस शिंदे गटाचे कल्याण जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे आणि ठाण्याचे खासदार नरेश म्हस्के




हेही उपस्थित होते. या बैठकीनंतर मनसेच्या नेत्यांनी आपल्या नगरसेवकांसह कोकण आयुक्तांची भेट घेत स्वतंत्र गट स्थापन केल्याची नोंद केली. उल्लेखनीय बाब म्हणजे, कल्याण-डोंबिवली महापालिकेची निवडणूक ठाकरे बंधूंच्या पक्षांनी एकत्र येऊन लढवली होती. मात्र येथील आठ ठिकाणी हे दोन्ही पक्ष एकमेकांविरोधात लढले. त्यामुळे दोन्ही पक्षांचा गटही स्वतंत्र्य स्थापन करण्यात आल्याचे मनसे नेत्यांनी सांगितले.

**स्वतंत्र गट स्थापन केल्यानंतर मनसेने तातडीने आपला शिंदे यांच्या पक्षाला पाठींबा असल्याचे जाहीर केले. यामुळे कल्याण डोंबिवली महापालिकेत शिंदेसेना आणि मनसे असा ५८ नगरसेवकांचा मोठा गट स्थापन झाला आहे. शिंदेसेनेला बहुमतासाठी आणखी चार नगरसेवकांची आवश्यकता असून कॉंग्रेसचे दोन आणि राष्ट्रवादीचा एक असे तीन नगरसेवक या पक्षाच्या नेत्यांच्या संपर्कात असून ठाकरे यांच्या पक्षाचे गायब असलेले दोन नगरसेवकही या प्रक्रियेत निर्णायक भूमीका बजावतील, अशी चर्चा आहे.**




## उल्हासनगरात शिवसेनेने गाठला मॅजिक फिगरचा आकडा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. २१
**उल्हासनगर**

उल्हासनगर महापालिकेत 40 नगरसेवकांचा गट स्थापन करत शिवसेना शिंदे गटाने मॅजिक फिगरचा आकडा गाठला आहे. त्यामुळे उल्हानगर महापालिकेत बहुमतासाठी शिंदे गटाला भाजपची आवश्यकता नाही.परंतु,सत्तेत भाजपला सोबत घेणार आणि महायुतीची सत्ता येणार, असं खासदार श्रीकांत शिंदे यांचं म्हणणं असल्याची माहिती कल्याण जिल्हा प्रमुख गोपाळ लांडगे यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे.

कल्याण डोंबिवलीत शिवसेना शिंदे गट आणि मनसेची युती झाल्यानंतर राजकीय वातावरण तापले असतानाच,दुसरीकडे उल्हासनगमध्ये शिंदे गटाने भाजपचा गेम केलाय. उल्हासनगरमध्ये एकूण 78 जागा आहेत. शिवसेनेचे आणि भाजपचे एकूण 37 नगरसेवक निवडून आले होते. काँग्रेसला 1,वंचित बहुजन आघाडीचे 2 आणि साई पक्षाचा 1 नगरसेवक निवडून आला. उल्हासनगर महापालिकेत सत्ता स्थापनेसाठी 40 जागांचं बहुमत गरजेचं आहे. शिंदे गटाने हा बहुमताचा आकडा गाठला आहे.

**■ एक नगरसेवक शिंदेंच्या शिवसेनेला पाठिंबा देणार**

शिंदे गटाने 40 नगरसेवकांचा गट स्थापन करत अरुण आशाण यांची गटनेतेपदी निवड केली आहे.शिवसेनेचे 37, वंचित बहुजन आघाडीचे 2 आणि साई पक्षाचा 1 गट तयार करण्यात आला आहे. तर काँग्रेसचा एक नगरसेवक शिंदेंच्या शिवसेनेला पाठिंबा देणार आहे. त्यामुळे आता शिंदे गटाला भाजपच्या जागांची गरज नाहीय. पण उल्हासनगरात महायुतीची सत्ता बसेल, असं श्रीकांत शिंदेंचं म्हणणं आहे.

**■ मुख्यमंत्र्यांनी ओमी कलानींना दिला होता इशारा**

उल्हासनगर मध्ये शिवसेना आणि भाजप दोन्ही पक्ष स्वबळावर निवडणुकीत रिंगणात होते. दोघांसाठी वर्चस्वाची लढाई होती. भाजपा प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी भाजपासाठी जोरदार प्रचार केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उल्हासनगर मध्ये मोठी सभा घेतली. "उल्हासनगर मध्ये गुंडगिरी चालणार नाही. या ठिकाणी कायद्याचं राज चालणार', असं म्हणत मुख्यमंत्री शिंदेंनी ओमी कलानी यांना इशारा दिला होता.

## संयुक्त घनकचरा प्रकल्प अंतिम टप्प्यात मात्र कचरा वाहतूकीला शिस्तीची गरज

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. २१

**बदलापूर : अंबरनाथ आणि बदलापूर नगर परिषदेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर दोन्ही शहरांच्या संयुक्त घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पावरून बदलापुरात सुरुवातीला विरोध पाहायला मिळाला होता. कचऱ्याची प्रक्रिया नेमकी कोण करणार, यावरून वादंग सुरू असतानाच शहरातील कचरा उचलणे आणि तो वाहून नेण्याच्या कामात बेजबाबदारपणा होत असल्याचे चित्र समोर आले आहे.**

दोन्ही शहरांतील कचरा वाहून नेणाऱ्या अनेक वाहनांना क्रमांक नसल्याचे आढळून येत आहे. तसेच हा कचरा उघड्या वाहनांतून वाहून नेण्यात येत असल्याने तो रस्त्यावर, मागून येणाऱ्या वाहनांवर तसेच प्रवाशांवर उडत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात आहेत. यामुळे वाहनचालक आणि कचरा वाहतूक करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये अनेकदा खटके उडत आहेत.

दरम्यान, अंबरनाथ आणि कुळगाव-बदलापूर नगर परिषदांचा संयुक्त घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प बदलापूर शहराच्या कचराभूमीवर सुरू असून, या प्रकल्पात उल्हासनगर महापालिकाही सहभागी झाली आहे. येत्या काही महिन्यांत हा प्रकल्प मार्गी लागण्याची शक्यता आहे. या प्रकल्पामुळे शेकडो टन कचऱ्यावर एकाच ठिकाणी शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया होणार असून, त्यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च करण्यात येत आहे.

मात्र, एवढ्या मोठ्या प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू असताना कचरा उचलणे व वाहतूक यंत्रणा अधिक जबाबदारीने आणि नियोजनबद्धपणे राबवण्याची गरज नागरिकांकडून व्यक्त होत आहे. प्रशासनाकडून या बाबींकडे गांभीर्याने लक्ष दिल्यास, भविष्यात हा प्रकल्प बदलापूर आणि अंबरनाथ शहरांसाठी स्वच्छतेच्या दृष्टीने मैलाचा दगड ठरू शकतो.

## मीरा-भाईंदरसाठी 1200 कोटींचे रस्ते

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
● प्रतिनिधी / दि. २१

**भाईंदरः** मीरा-भाईंदर शहराला आधुनिक सुविधांनी सुसज्ज करून विकासाच्या नवीन उंचीवर नेण्यासाठी एक ऐतिहासिक पाऊल उचलण्यात आले आहे. फेब्रुवारीमध्ये मेट्रो, महिला उद्योजकतेसाठी एम्पॉवरमेंट मॉल आणि वसतीगृह शहराला मिळणार असल्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी बैठकीत सांगितले. या बैठकीलामहापालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा आणि सर्व विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीदरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निवडणूक आचारसंहिता लागू होण्यापूर्वी रस्ते काँक्रिटीकरणासाठी अतिरिक्त १२०० कोटी रुपये मंजूर केले. निविदा प्रक्रिया लवकरच सुरू होईल. मंत्री सरनाईक यांनी पुढील दीड ते दोन वर्षांत मिराभाईंदर खड्डेमुक्त करण्याची आपली वचनबद्धता असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.




## महत्वाचे

### दिव्यातील तिकीटघराची वेळ वाढवा - प्रवाशी संघटनेची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. २१

**ठाणे** - दिवा रेल्वे स्थानकातून दररोज प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या सातत्याने वाढत असून दिवा शहराची सुमारे ९० टक्क्यांहून अधिक लोकवस्ती ही पूर्व भागात आहे. मात्र या तुलनेत दिवा रेल्वे स्थानकाच्या पूर्वेकडील प्रवाशांसाठी उपलब्ध असलेल्या तिकीट सुविधांमध्ये मोठी अपुरी व्यवस्था असल्याची तक्रार प्रवाशांकडून करण्यात येत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळेस स्थानकाच्या पूर्वेकडील तिकीटघर रात्री ९ वाजताच बंद होत असल्यामुळे प्रवाशांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असून, हे तिकीटघर रात्री १२ वाजेपर्यंत सुरू ठेवावे, अशी मागणी दिवा रेल्वे प्रवाशी संघटनेच्या माधमातून करण्यात आली आहे.

### गॅस गळतीमुळे डोंबिवलीत स्फोट

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. २१

**कल्याणः** डोंबिवली पूर्वेतील नवनीत नगर संकुलात घरगुती गॅस सिलेंडरमधून झालेल्या गळतीमुळे मध्यरात्री बाराच्या सुमारास भीषण स्फोट झाल्याची धक्कादायक घटना घडली. ज्यामध्ये एक व्यक्ती गंभीर जखमी असून चार जणांना किरकोळ दुखापत झाली आहे. डोंबिवली पूर्वेतील देसलेपाडा परिसरातील नवनीत नगर संकुलातील एका इमारतीच्या 510 क्रमांकाच्या फ्लॅटमध्ये केतन देढिया हे वास्तव्यास आहेत. त्यांच्या घरातील गॅस सिलेंडरमधून गॅसची गळती सुरू होती. मध्यरात्री केतन देढिया घरी परतल्यानंतर लाईट चालू करताच अचानक मोठा स्फोट झाला. ज्यामध्ये केतन देढिया गंभीर जखमी झाले असून त्यांच्या घराचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. स्फोटाचा जोर इतका प्रचंड होता की शेजारील फ्लॅटमध्ये राहणारे मेहुल वासाड आणि विजय घोर हेदेखील किरकोळ जखमी झाले असून त्यांच्या घरांचेही नुकसान झाले आहे. तसेच केतन देढिया यांच्या घरातील खिडकी आणि लोखंडी ग्रील तुटून खाली कोसळले. याचवेळी इमारतीच्या परिसरात खाली फिरत असलेले हरीश लोढाया आणि त्यांचा सात वर्षांचा मुलगा पार्श्व लोढाया यांच्या अंगावर काचांचे तुकडे पडल्याने ते किरकोळ जखमी झाले.

## आम्ही महापालिकेत युतीधर्म पाळणार !

### भाजपा जिल्हाध्यक्ष नंदकिशोर परब




दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. २१

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली पालिका निवडणुकीसाठी आम्ही युती म्हणून लढलो आहोत आणि युती म्हणूनच सत्तास्थानी पोहचलो आहोत, अशी माहिती भाजपचे कल्याण जिल्हाध्यक्ष नंदकिशोर परब यांनी दिली. त्यांचे म्हणणे आहे की, “कोण काय करत आहे याकडे आमचे लक्ष नाही. आम्ही पालिकेत युतीधर्म पाळणार आहोत.”

पालिका निवडणुकीनंतर शिवसेनेने संख्याबळाचे गणित साध्य करण्यासाठी मनसेबरोबर हात मिळवण्याची तयारी केली असून, इतर पक्षातील नगरसेवक आपल्यात घेण्याचे प्रयत्न करत आहेत. याबाबत परब यांनी सांगितले, “आम्हाला यासंदर्भात काही माहिती नाही आणि आम्ही यावर काही बोलणार नाही. आम्ही युतीधर्माचे पालन करून कल्याण-डोंबिवली पालिकेचा कारभार चालवणार आहोत.”

परब यांनी पुढे सांगितले की, शहर विकासाची अनेक आश्वासने देऊन, नागरी समस्या सोडविण्याची हमी देऊन आम्ही पालिकेतील सत्तापदी निवडून आलो आहोत. त्यामुळे नागरिकांना दिलेली आश्वासने पूर्ण करण्याकडे आमचा सर्वाधिक कल असेल. सत्ता पदासाठी कोण काय करतोय किंवा कोण कोणत्या पक्षात येतो याविषयी आम्हाला काहीही प्रतिक्रिया देण्यास मज्जाव आहे, त्यामुळे घडलेल्या प्रकारांवर आम्ही काही बोलणार नाही, असेही परब यांनी स्पष्ट केले.

### कल्याण डोंबिवली महापालिकेत

## शिवसेना ठाकरे गटाच्या गटनेतेपदी उमेश बोरगावकर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. २१

कल्याण-डोंबिवली महापालिका निवडणुकीत शिवसेना (उद्धव बाळा-साहेब ठाकरे) पक्षाचे ११ नगरसेवक निवडून आले आहेत. पालिकेतील गटनेत्याची निवड करण्यासाठी आज नवनियुक्त नागरसेवकांची बैठक झाली. या बैठकीमध्ये शिवसेना गटनेतेपदी उमेश बोरगावकर यांची सर्व सहमतीने निवड करण्यात आली. कल्याण पश्चिम येथील शिवसेना मध्यवर्ती शाखेत नगरसेवकांची बैठक झाली. या बैठकीला उमेश बोरगावकर, रोहन कोट, संकेश भोईर, विशाल गारवे, नीलेश खंबायत, तेजश्री गायकवाड, वंदना महिले, अपर्णा भोईर, स्वप्नाली केणे हे नगरसेवक उपस्थित होते. या बैठकीत ज्येष्ठ नगरसेवक उमेश



बोरगावकर यांची गटनेतेपदी नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या निवडीचे अधिकृत पत्र शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आले असल्याची माहिती जिल्हाप्रमुख शरद पाटील यांनी दिली. दरम्यान, गटनेता निवडीच्या बैठकीला मधुर म्हात्रे आणि कीर्ती ढोणे हे दोन नगरसेवक गैरहजर होते. पक्षाच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या या दोन्ही नगरसेवकांवर अपात्रतेची कारवाई करण्यासाठी कोकण विभागीय आयुक्तांना पत्र दिल्याची माहिती शरद पाटील यांनी दिली.



# आरटीई 25 टक्के प्रवेश नोंदणीला मुदतवाढ जाहीर

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : शिक्षण हक्क कायदा (Right to Education – RTE) अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकातील विद्यार्थ्यांना खासगी विनाअनुदानित व स्वयंअर्थसहाय्यित शाळांमध्ये २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश देण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

या प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या टप्प्यात शुक्रवार, दिनांक ०९ जानेवारी २०२६ ते १९ जानेवारी २०२६ या कालावधीत विनाअनुदानित व स्वयंअर्थसहाय्यित शाळांसाठी शाळा नोंदणी (School Registration) व शाळा पडताळणी (School Verification) साठी संबंधित संकेतस्थळावरील लिंक कार्यान्वित करण्यात आली होती. मात्र, दिलेल्या मुदतीत आरटीई २५ टक्के प्रवेशासाठी शाळा नोंदणी व शाळा पडताळणीचे काम शंभर टक्के पूर्ण झाले नसल्याने, मा. शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, पुणे यांचे दिनांक १९ जानेवारी २०२६ रोजीच्या पत्रान्वये या प्रक्रियेस मुदतवाढ देण्यात आली आहे.

त्यानुसार, शाळा नोंदणी व शाळा पडताळणीसाठी दिनांक २० जानेवारी २०२६ ते २७ जानेवारी २०२६ या कालावधीत अंतिम मुदत देण्यात आली असून, या कालावधीत संबंधित सर्व विनाअनुदानित व स्वयंअर्थसहाय्यित शाळांनी आपली ऑनलाईन नोंदणी व शाळा पडताळणीची प्रक्रिया पूर्ण करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

शाळा पडताळणी करताना विशेष दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, बंद करण्यात आलेल्या शाळा, अल्पसंख्याक दर्जा प्राप्त शाळा, अनधिकृत शाळा तसेच स्थलांतरित (Relocated) झालेल्या शाळा या आरटीई कायद्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मध्ये २५ टक्के प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट करण्यात येणार नाहीत, याची खबरदारी घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

तसेच, शाळांना ज्या शिक्षण मंडळाची (Board) मान्यता आहे, तेच मंडळ शाळा नोंदणी करताना निवडले आहे का, याची काटेकोर तपासणी करणे आवश्यक असून, कोणत्याही प्रकारची चुकीची, अपूर्ण किंवा दिशाभूल करणारी माहिती नोंदवली जाणार नाही, याबाबत शाळा प्रशासनाने विशेष काळजी घ्यावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

या संदर्भातील सूचना सर्व महापालिकांचे शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी तसेच पंचायत समितींचे गटशिक्षणाधिकारी यांना देण्यात आल्या असून, आरटीई प्रवेश प्रक्रिया पारदर्शक, अचूक व वेळेत पूर्ण होण्यासाठी सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वयाने कार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच, सदर कालावधीनंतर पुन्हा कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रिया ही समाजातील दुर्बल व वंचित घटकातील बालकांना दर्जेदार शिक्षण व समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनामार्फत राबविण्यात येत असून, संबंधित शाळा प्रशासनाने या प्रक्रियेस गांभीर्याने घेऊन दिलेल्या अंतिम मुदतीत आवश्यक कार्यवाही पूर्ण करावी, असे निर्देश शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद ठाणे बाळासाहेब राक्षे यांनी दिले आहेत.



**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नगरसेवक श्री. प्रल्हाद परशुराम म्हात्रे यांची कल्याण–डोंबिवली महानगरपालिका गटनेतेपदी निवड**

# प्रजासत्ताक दिनी केडीएमसीत विद्यार्थ्यांचे भव्य कवायत संचलन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : राज्यातील सर्व माध्यमाच्या शासकीय व खाजगी व्यवस्थापनाच्या सर्व शाळांमध्ये प्रजासत्ताक दिन विविध उपक्रमांसह साजरा करण्याबाबत शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फ़त सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामार्फत २६ जानेवारी २०२६ रोजी देशाच्या स्वातंत्र्यदिनानिमित्ताने राज्यातील सर्व माध्यमाच्या शासकीय व खाजगी व्यवस्थापनाच्या सर्व शाळांमध्ये शालेय विद्यार्थ्यांच्या कवायतीचा सराव घेऊन विद्यार्थ्यांची तयारी करण्याबाबत कळविण्यात आले.



या परिपत्रकानुसार महानगरपालिकेच्या सर्व व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये मागील एक महिन्यापासून विद्यार्थ्यांच्या संगीतबद्ध सामूहिक कवायतीचा वीस मिनिटांचा सराव दररोज घेण्यात येत आहे. तसेच शनिवारी किमान एक तासाचा सराव प्रत्येक शाळेत सुरू करण्यात आलेला आहे. २६ जानेवारी २०२६ रोजी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या प्रत्येक गटांतर्गत व सीआरसी अंतर्गत असलेल्या शाळांचे सामूहिक संचलन गट व सीआरसी स्तरावर संगीतबद्ध कवायतीचे सादरीकरण होणार आहे.

शिक्षण विभागाचे प्रशासन अधिकारी भारत बोरणारे तसेच शिक्षणाधिकारी विजय सरकटे यांनी कडोमपा सीआरसी शाळा मिलिंद नगर, शारदा मंदिर, मातोश्री रखमाबाई गायकवाड विद्यालय, कडोमपा सीआरसी नेतीवली कल्याण पूर्व अशा अनेक शाळांना प्रत्यक्ष भेटी देऊन या सरावाची पाहणी केली, तसेच आवश्यक त्या ठिकाणी मार्गदर्शन केले.

# स्वीप अंतर्गत मतदार जनजागृती रॅली कार्यक्रम संपन्न

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**रायगड :** जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-2026 च्या पार्श्वभूमीवर स्वीप (Systematic Voters' Education and Electoral Participation) कार्यक्रमांतर्गत (दि.20/01/2026) रोजी आदिवासी वाडी, मेंदडीकोंड, ता.म्हसळा येथे मतदार जनजागृती रॅली कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश मतदारांमध्ये मतदानाबाबत जागरूकता निर्माण करणे व शंभर टक्के मतदान साध्य करणे हा होता.या कार्यक्रमासाठी गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती म्हसळा श्री.साबळे, वरिष्ठ विस्तार अधिकारी पंचायत समिती म्हसळा अरविंद मोरे, झोनल ऑफिसर मेंदडी आनंद घरत, तसेच संपूर्ण स्वीप समिती उपस्थित होती.रॅलीची सुरुवात मार्गदर्शकांच्या उपस्थितीत करण्यात आली. गावातील प्रमुख मार्गावरून रॅली काढण्यात आली. विद्यार्थ्यांनी व ग्रामस्थांनी हातात फलक घेऊन "माझे मत – माझा हक्क", "प्रत्येक मत अमूल्य आहे", "लोकशाही मजबूत करा – मतदान करा" अशा घोषणा देत जनजागृती केली. मार्गदर्शकांनी मतदारांना मतदानाचा अधिकार, मतदार नोंदणी प्रक्रिया, EVM व VVPAT बाबत माहिती, तसेच निर्भय व नैतिक मतदानाचे महत्त्व समजावून सांगितले. नागरिकांनी कोणत्याही दबावाशिवाय मतदान करावे व लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा असे आवाहन केले.

या रॅलीला सर्व गावकरी व मतदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महिलावर्ग, युवक व ज्येष्ठ नागरिकांचा मोठा सहभाग लाभला. कार्यक्रमामुळे मतदारांमध्ये सकारात्मक जागृती निर्माण झाली असून सर्वांनी आगामी निवडणुकीत शंभर टक्के मतदान करण्याचा संकल्प व्यक्त केला. एकूणच स्वीप अंतर्गत आयोजित मतदार जनजागृती रॅली अत्यंत यशस्वी ठरली. मार्गदर्शकांचे मोलाचे मार्गदर्शन, स्वीप समितीचे नियोजन व ग्रामस्थांचा सहभाग यामुळे लोकशाही मूल्यांची जाणीव अधिक दृढ झाली.

# मुंबई-वडोदरा महामार्गावर लामज एंट्री-एक्सिटला १३२ कोटी

## खासदारांच्या प्रयत्नांना यश

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : भिवंडी तालुक्यातून जाणाऱ्या मुंबई वडोदरा महामार्गाला लामज येथे एंट्री-एक्सिट कामासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयाने मंजुरी देत या कामासाठी १३२ .२८ कोटी रुपयांच्या ठेक्याची निविदा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने जाहीर केली आहे.त्यामुळे लवकरच या कामाला सुरुवात होणार असून या एंट्री - एक्सिट मुळे भिवंडीकरांचा प्रवास आणखी सुखकर होणार असून औद्योगिक विकासात देखील मोठी वाढ होणार आहे.



या मागणीसाठी संघर्ष समितीने भिवंडीचे खासदार सुरेश (बाळ्या मामा) म्हात्रे यांच्याकडे पाठपुरावा केला होता.खा.म्हात्रे यांनी संघर्ष समितीच्या सदस्यांसोबत केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेत या विषयाचा सतत पाठपुरावा केंद्रीय स्तरावर केला होता.त्याच्या मागणीला केंद्रीय मंत्री गडकरी यांनी सकारात्मकता दाखवत यासाठी निधी मंजूर केला होता. अखेर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने १६ जानेवारी रोजी या कामाची निविदा जाहीर केली आहे.

या कामामुळे मुंबई वडोदरा महामार्गावरून प्रवास करतांना भिवंडी करांचा प्रवास सुखकर होणार असून औद्योगिक विकासात देखील वाढ होणार आहे.या बाबतची मागणी आपण सतत लावून धरली होती अखेर आमच्या मागणीला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला व आता या कामाची निविदा देखील जाहीर झाली त्यामुळे आम्ही केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे जाहीर आभार मानतो अशी प्रतिक्रिया खासदार म्हात्रे यांनी दिली आहे.

# हेमा पिंजानींचा पराभव

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**उल्हासनगर** : पालिका निवडणुकीतील सर्वाधिक श्रीमंत असलेल्या भाजप उमेदवार हेमा पिंजानी यांचा शिंदेसेनेच्या जया माखिजा यांच्याकडून अवघ्या ५७मतांनी पराभव झाला, तर दुसऱ्या क्रमांकाचे शिंदेसेनेचे श्रीमंत उमेदवार राजेंद्र सिंग भुल्लर यांचा विजय झाला असून, काँग्रेसचे श्रीमंत उमेदवार विजय ठाकूर यांचा पराभव झाला. उल्हासनगर पालिका निवडणुकीत ९३ कोटीची सर्वाधिक मालमत्ता दाखविणाऱ्या भाजपच्या उमेदवार पिंजानी यांच्या लढतीकडे सर्वाचे लक्ष लागले होते. पिंजानी व माखिजा यांच्यात थेट लढत झाली.

# केडीएमसी गटनेतेपदी शिवसेनेचे ज्येष्ठ नगरसेवक विश्वनाथ राणे



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** शिवसेना पक्षातर्फे ज्येष्ठ नगरसेवक विश्वनाथ राणे यांची कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या गटनेतेपदी निवड करण्यात आली आहे. प्रदीर्घ अनुभव आणि स्थानिक प्रश्नांची सखोल जाण असलेल्या विश्वनाथ राणे यांच्याकडे आता महापालिकेतील शिवसेनेची नेतृत्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. शिवसेनेचे ज्येष्ठ नगरसेवक विश्वनाथ राणे **केडीएमसी गटनेतेपदी निवड ;** या निवडीमुळे केडीएमसीतील शिवसेनेची भूमिका अधिक प्रभावी होणार असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

# बदलापूर रेल्वे स्थानकात एनएसएस स्वयंसेवकांची भव्य स्वच्छता मोहीम

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई** : मंगळवार दिनांक २० जानेवारी २०२६ रोजी मुंबई विद्यापीठ एनएसएस विभाग, आरोग्य योगा नेचरोपॅथी इन्स्टिट्यूट, जीवन फाउंडेशन, निर्भीड पत्रकार संघ व जन्मदा आय अँड मेडिकल फाउंडेशन, यांच्या संयुक्त विद्यमाने विठ्ठलवाडी,उल्हासनगर,अंबरनाथ व बदलापूर शहरातील एकूण १२ कॉलेजेसच्या एन.एस.एस वॉलेंटियर्सना एकत्रित करून भारत सरकारच्या युवा व क्रीडा मंत्रालया तर्फे सुरू करण्यात आलेल्या स्वछता ही सेवा या अभियाना अंतर्गत बदलापूर रेल्वे स्टेशन व परिसरातील स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली. या कार्यक्रमाचे आरोग्य योगा नेचरोपॅथी इन्स्टिट्यूट चे डॉ.विजय कुकरेजा, एन. एस.एस ठाणे जिल्हा समन्वयक डॉ जीवन विचारे, निर्भीड पत्रकार संघाचे श्री संजय कदम तसेच एन.एस.एस विभागाचे सर्व कॉलेजचे प्रोग्रॅम ऑफिसर्स व एरिया कॉर्डिनेटर श्री नीरज मिश्रा यांनी विशेष योगदान दिले, ही स्वच्छता मोहिम कुळगाव बदलापूर नगर परिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ रुचिताताई घोरपडे यांच्या प्रमुख मार्गदर्शनात करण्यात आली तसेच भारतीय जनता पार्टी कोकण विभाग आयटी सेल प्रमुख डॉ. मिलिंद धारवाडकर, भाजपा शहर उपाध्यक्ष श्री चंद्रशेखर उगले, श्री पंढरीनाथ सावंत हे देखील उपस्थित होते. या स्वच्छता मोहिमेसाठी एन.एस.एस च्या सुमारे १२५ व्हॉलेंटीयर्सनी सहभाग घेतला, यावेळी नगराध्यक्षा सौ रुचिताताई घोरपडे यांनी सर्व आयोजकांचे व सर्व व्हॉलेंटीयर्सचे कौतुक व मार्गदर्शन केले तसेच यापुढेही बदलापूर रेल्वे स्टेशनवर नियमित पणे स्वच्छता मोहीम राबवून बदलापूर रेल्वे स्टेशन हे मध्य रेल्वेचे सर्वात चांगले व स्वच्छ रेल्वे स्टेशन कसे होईल याकरिता प्रयत्न करणार असल्याचे सांगितले, आपल्या देशातील युवा हीच आपली खरी शक्ती आहे आणि हीच शक्ती आपल्या देशाला जगातील महाशक्ती सोबतच स्वच्छता देखील मिळवून देईल असे मत डॉ मिलिंद धारवाडकर यांनी या प्रसंगी व्यक्त केले, या कार्यक्रमाचा समारोप करतांना ०२/१०/२०२५ रोजी केलेल्या स्वछता मोहिमेत सहभागी झालेल्या व्हॅलेंटायर्सना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले, हि स्वछता मोहीम बदलापूर रेल्वे स्टेशनवर केल्याबद्दल बदलापूर स्टेशन मॅनेजर सौ धनश्री गोडे यांनी सर्वांचे आभार मानले



# भिवंडीत सिकलसेल रुग्णांसाठी अरुणोदय विशेष उपक्रम




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

भिवंडी : भिवंडी शहरातील स्व. इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयात ७ फेब्रुवारी पर्यंत अरुणोदय - सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमाचा शुभारंभ रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. माधवी पंदारे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात करण्यात आला. प्रसंगी डॉ.गुलफाम शेख,डॉ.इजहार अन्सारी,सहायक अधिसेविका हेमलता जाधव, अश्विनी नाडे,प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी देविदास शेटगे,राजेंद्र शिंदे आदीं मान्यवर उपस्थित होते.

या सप्ताह मध्ये सिकल सेल रक्त तपासणी, सिकल सेल बद्दल समुपदेशन,विवाह पूर्व सिकल सेल समुपदेशन करण्यात येणार आहे.रुग्णालयातील एन सी डी विभाग अंतर्गत किशोरवयीन मुला मुलींना सिकल सेल बद्दल समुपदेशन करण्यात येणार आहे. स्व इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयात सर्व गरोदर माता यांची सिकल सेल रक्त तपासणी केली जाते,तसेच ० ते ४० वयोगटातील नागरिकांनी उस्फुर्त सहभाग घेऊन आपली रक्त तपासणी करून घ्यावी.त्यासाठी रुग्णालयातील प्रयोगशाळा विभाग तसेच महालॅब या अभियाना साठी सज्ज आहे असे आवाहन नागरिकांना रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ.माधवी पंदारे यांनी केले आहे.

# पालकांनी सुद्धा मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देणे आवश्यक आहे – सुलभा गायकवाड

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : पाली भाषा प्रचार आणि प्रसार ट्रस्ट संचलित सम्राट अशोक प्राथमिक आणि माध्यमिक तसेच विपश्यना बालविहार यांचे संयुक्त वार्षिक स्नेहसंमेलन नुकतेच कल्याणच्या करपेवाडी सभागृहात पार पडले. महाराष्ट्राच्या रूढी, परंपरा, व्यवसाय, पाणीबचत,सोशल माध्यमांचा गैरवापर यावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम विद्यार्थ्यांनी सादर केले.

कार्यक्रमाप्रसंगी कल्याण पूर्वच्या आमदार सुलभा गायकवाड, शिक्षण मंडळाचे शिक्षण अधिकारी विजय सरकटे, संस्थेचे अध्यक्ष पी.टी.धनविजय, सचिव गौतमी धनविजय तसेच मुख्याध्यापक गुलाबराव पाटील, सुजाता नलावडे उपस्थित होते. सुलभा गायकवाड आपल्या मनोगतात म्हणाल्या मराठी माध्यमाच्या शाळा शिक्षणाबरोबर संस्कार देतात. सम्राट अशोक विद्यालय गोरगरिबांची शाळा आहे. परंतु शिक्षण चांगले आहे. पालकांनी सुद्धा मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देणे आवश्यक आहे.



विजय सरकटे म्हणाले, आता आनंदायी शिक्षण आलेले आहे या शाळेत पूर्वीपासूनच उपक्रम केले जातात. उपक्रमातून आनंदायी शिक्षण दिले जाते. सम्राट अशोक उपक्रमशील शाळा म्हणून ओळखली जाते. सांस्कृतिक कार्यक्रमात 265 विद्यार्थ्यांचा सहभाग होता. आपल्या मुलांचा सांस्कृतिक कार्यक्रम पाहून पालक उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देत होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माध्य. मुख्याध्यापक गुलाबराव पाटील यांनी केले. तर सूत्रसंचालन सहशिक्षक गणेश पाटील यांनी केले असून उपस्थितांचे आभार प्राथ. मुख्याध्यापिका सुजाता नलावडे यांनी मानले.

# भविष्यवेध



**गुरुवार**
**२२ जानेवारी २०२६**

**मेष**
नव्या योजना, कल्पना अंमलात आणल्या जातील, ज्यामुळे सकारात्मक परिणाम मिळतील. व्यावसायिक क्रियाकलापांमध्ये सुधारणा होईल. कुटुंबियाना वेळ द्या.

**वृषभ**
स्वाभिमान आणि धैर्य ही तुमची सर्वात मोठी संपत्ती ठरेल. स्वभाव तुमचा मान देशात आणि परदेशात कायम ठेवेल. आरोग्याची काळजी घ्या.

**मिथुन**
अनुभवी आणि जबाबदार लोकांचे मार्गदर्शन आणखी मजबूत बनवेल. व्यावसायिक कामे सामान्य राहतील. यशासाठी कठोर परिश्रम करावे लागतील.

**कर्क**
ऑफीसचं कामकाज सुरळीत पार पडेल. वाईट परिस्थितीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याची आवश्यकता आहे. सकारात्मकतेने उपाय सापडेल.

**सिंह**
वैवाहिक जीवन आनंदी राहील. मित्राला भेटल्याने जुन्या आठवणी जागृत होतील, आनंदाची भावना येईल. बदलत्या वातावरणामुळे, सावधगिरी बाळगाल.

**कन्या**
घराची देखभाल किंवा नूतनीकरणाची योजना आखत असाल तर वास्तु तत्वांचा वापर करा. या काळात तुमच्या समस्या सोडवल्या जाऊ शकतात.

**तुळ**
व्यवसायातील धावपळीतून थोडा आराम मिळेल, ज्यामुळे नवीन कामांवर लक्ष केंद्रित करू शकाल. रिअल इस्टेटमध्ये गुंतलेल्यांना सौदे मिळू शकतात.

**वृश्चिक**
ऑफीसमध्ये नीट ताळमेळ राखा. वैयक्तिक संबंध अधिक जवळचे होतील. वडीलधाऱ्यांचे आशीर्वाद आणि प्रेम घरात सकारात्मक ऊर्जा आणेल.

**धनु**
काम उद्यावर ढकलू नका, आजच ते करा. नाहीतर परिणाम चांगले होणार नाहीत. तोटा होऊ शकतो. ऑफीसचं काम वरिष्ठांना आवडेल आणि उत्पन्नही वाढेल.

**मकर**
योजनांपैकी एक योजना आकार घेईल. म्हणून, तुमचे प्रयत्न कमी पडू देऊ नका. धार्मिक आणि आध्यात्मिक कार्यांसाठी थोडा वेळ द्या.

**कुंभ**
कामे पूर्ण करण्यावर अधिक लक्ष केंद्रित कराल. सर्व व्यावसायिक कामे सुरळीतपणे पार पडतील, म्हणून प्रयत्न आणि लक्ष केवळ कामावर केंद्रित करा.

**मीन**
उत्पन्न वाढवण्याचे प्रयत्न आज यशस्वी होण्याची शक्यता आहे. तुमच्या मुलांकडून मिळालेली चांगली बातमी तुमच्या घरात आनंद आणेल.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://www.facebook.com/jeevandeepnews/
https://www.instagram.com/thane_jeevandeep/
https://x.com/Jeevandeepvarta
https://jeevandeepvarta.com/






# अशा वागणुकीला महाराष्ट्र माफ करणार नाही !

## कल्याण-डोंबिवलीतील शिवसेना मनसे युतीवर संजय राऊतांची नाराजी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २१**

**कल्याण** : कल्याण-डोंबिवली महापालिकेत महायुतीमधील शिवसेना (शिंदे गट) महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पाच नगरसेवकांचा पाठिंबा घेऊन सत्ता स्थापनेस सज्ज झाली आहे. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी मनसे आणि शिवसेना (शिंदे) एकत्र सत्तेत राहणार असल्याचे जाहीर केले, तर मनसेनेही या आघाडीचे स्वागत केले आहे. मात्र या विषयावर शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी गंभीर प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

संजय राऊत म्हणाले, "आमची भूमिका फार वेगळी आणि कडवट आहे. ज्यांनी महाराष्ट्राशी, बाळासाहेब ठाकरे यांच्यासह गद्दारी केली, अशा व्यक्तींशी राजकीय किंवा अन्य संबंध ठेवायचे नाहीत. महाराष्ट्राच्या गद्दारांना मदत होईल अशी भूमिका आम्ही कधीही घेणार नाही. राज ठाकरेही तसे नेते आहेत. कल्याण-डोंबिवलीचा विषय अत्यंत चिंताजनक आहे."

"हा स्थानिक पातळीवरचा निर्णय असला तरी पक्षाच्या मूळ धोरणाशी प्रतारणा करणाऱ्यांवर कारवाई करणे गरजेचे आहे. अंबरनाथमध्ये काँग्रेसच्या नगरसेवकांनी भाजपसोबत हातमिळवणी केली तेव्हा त्यांच्यावर कारवाई झाली होती. शिवसेना आणि मनसे एकत्र निवडणुका लढवल्या असताना एखादी व्यक्ती बेईमानी करत असेल, तर पक्षाने स्पष्ट भूमिका घेतली पाहिजे." असही राऊत पुढे बोलताना म्हणाले.

संजय राऊत यांनी स्पष्ट केले की, "शिंदे गट आणि त्याच्याबरोबर जाणारे लोक महाराष्ट्रासाठी बेईमान आहेत. सत्ता मिळाली नाही म्हणून अशा प्रकारची गद्दारी महाराष्ट्र माफ करू शकत नाही."

त्यांनी सांगितले की, "कल्याण-डोंबिवलीचा विषय उद्धव ठाकरे यांनी गांभीर्याने घेतला आहे. काही मिळालं नाही तर मी सोडून जातो अशा मानसिकतेत काही लोक आहेत. राजकारणातील मानसिकतेमुळे हे घडत आहे. अशा प्रकारच्या घडामोडींमुळे राज ठाकरेही व्यथित झाले आहेत."






### पत्रकार संजय कांबळे यांच्या घरासह
# संपूर्ण महाराष्ट्रात घरफोडी करणाऱ्या सराईत चोरट्यांना बेड्या!

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २१**

**कल्याण** : घरात कोणी नसल्याचा ,घर बंद असल्याचा फायदा घेऊन धाडसी घरफोड्या करणाऱ्या सराईत चोरट्यांना ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक अंतर्गत शहापूर पोलीस ठाणे यांच्या अथक प्रयत्न आणि परिश्रम आणि त्याला कल्याण तालुका पोलीस ठाण्याचे सहकार्य यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात धुमाकूळ घालणा-या चोरट्यांना जेरबंद करण्यात यश आले असून यामध्ये पत्रकार संजय कांबळे यांच्या घरातील चोरीचा देखील समावेश आहे, त्यामुळे पोलिसांच्या या धडाकेबाज कामगिरी चे त्यांनी कौतुक करून पोलीस अधीक्षक डॉ डि एस स्वामी यांचे व त्यांच्या टिमचे अभिनंदन केले आहे. कल्याण तालुक्यातील पत्रकार संजय कांबळे यांचे कुटुंबिय बाहेरगावी गेल्याचे पाहून त्यांच्या घरी दिवसाढवळया घरफोडी करून सोन्याचे दागिने चोरून नेण्यात आले होते, कल्याण तालुका पोलीस ठाण्याचे वरीष्ठ निरीक्षक 'सिंगम, अर्थात पंकज गिरी यांनी सर्वोतोपरी प्रयत्न करुन देखील यश यत नव्हते, यांची टिण कसारा, घोटी पर्यंत चोरट्यांचा माग काढत गेले होते, याच दरम्यान गोवेली येते हत्या झाल्याने पोलिसांचे याकडे थोडेसे दुर्लक्ष झाले, यानंतर पत्रकार कांबळे यांनी डिवाय एसपी अनिल लाड यांची भेट घेऊन याबाबत माहिती घेतली, अखेरीस ठाणे पोलीस अधीक्षक डॉ डि एस स्वामी यांची भेट घेऊन संबंधित घरफोडी बाबतीत विचारणा केली. यावेळी त्यांचा वाद झाल्याने त्यांनी पोलीस अधीक्षक श्री स्वामी यांच्या विरोधात विशेष पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांच्या कडे लेखी तक्रार दाखल केली होती. अखेरीस या सर्वांचा परिणाम म्हणून पोलीस अधीक्षक ठाणे ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष तपास पथके तयार करण्यात आली होती. कल्याण तालुका पोलीस डिवाय एसपी अनिल लाड यांच्या तर शहापूर पोलीस मिलिंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाची चक्रे फिरवत होते. शेवटी शहापूर विभागाचे प्रभारी अधिकारी मुकेश ढगे, गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे पो उप नि/अलोक खिसमतराव, पो हवा शशिकांत पाटील, मंजूर शेख, पो ना विकास सानप, पो अंमलदार रमेश नलावडे, मोहन भोईर, दशरथ देसले, जितेंद्र गिरासे, कमलाकर शिरोसे, अमित दुबळा, मनिषा गांगुर्डे, या पथकाने धडाकेबाज कामगिरी करुन आरोपी कैलास चिंतामण मोरे,(४४)जयप्रकाश राजाराम यादव(३६)रा सोनगीर जि धुळे आणि तिसरा आरोपी यांना सीसीटीव्ही फुटेज तसेच तांत्रिक विश्लेषण च्या आधारे अटक करण्यात आली आहे. या आरोपीच्या विरोधात अमरावती, रत्नागिरी, वर्धा, कोल्हापूर, सांगली,धुळे, अहिल्यानगर, आदी विविध जिल्ह्यात गुन्हे दाखल असून पोलिसांनी मुद्देमाल हस्तगत केला आहे. त्यामुळे या कामगिरी चे पत्रकार संजय कांबळे यांच्या सह संपूर्ण कुटुंबियांनी ठाणे पोलीस अधीक्षक डॉ स्वामी, अप्पर पोलीस अधीक्षक, अनमोल मित्तल, शहापूर चे डिवाय एसपी मिलिंद शिंदे, मुरबाडचे डिवाय एसपी अनिल लाड, शहापूर चे सर्व पोलीस अधिकारी, कर्मचारी, कल्याण तालुका पोलीस ठाण्याचे सिंगम पंकज गिरी, त्यांचे सर्व सहकारी या सर्वांचे अभिनंदन केले आहे.



# पालघर जिल्हाधिकारी कार्यालयाला आंदोलकांचा घेराव

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २१**

**पालघर** : विविध मागण्यांसाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने काढण्यात आलेला लाँग मार्च काल महाराष्ट्रातील पालघर जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. या लाँग मार्चमध्ये मोठ्या संख्येने कार्यकर्ते आणि नागरिक सहभागी झाले होते. आपल्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलकांनी जिल्हाधिकारी कार्यालयाला घेराव घालत ठिय्या आंदोलन सुरू केले आहे.

आंदोलकांच्या वतीने विविध सामाजिक, आर्थिक आणि जनहिताच्या मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात आले आहे. शेतकरी, आदिवासी, कामगार तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

या आंदोलनाबाबत माहिती देताना आमदार विनोद निकोले यांनी सांगितले की, प्रशासनाने आंदोलकांच्या मागण्यांवर चर्चा करण्याची तयारी दर्शवली आहे. लवकरच सकारात्मक तोडगा निघेल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. दरम्यान, प्रशासन आणि आंदोलकांमध्ये चर्चेची प्रक्रिया सुरू होणार असल्याने पुढील घडामोडींवर सर्वांचे लक्ष लागले आहे.

# आभार की आडंबर?
## वसई-विरार आभार फलकांच्या विळख्यात

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २१**

वसई : वसई-विरार महापालिका निवडणूक पार पडल्यानंतर शहरात राजकीय हालचालींना वेग आला असतानाच, दुसरीकडे शहर विद्रुपीकरणाचा गंभीर प्रश्न पुन्हा एकदा समोर आला आहे. विविध राजकीय पक्ष तसेच अपक्ष उमेदवारांकडून लावण्यात येणाऱ्या आभार प्रदर्शनाच्या फलकांमुळे संपूर्ण शहर पुन्हा एकदा फलकांच्या विळख्यात अडकले असून, नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

१६ जानेवारी रोजी वसई-विरार महापालिका निवडणुकीचा निकाल जाहीर झाला. या निवडणुकीत बहुजन विकास आघाडीने ७०, भाजपने ४३, शिवसेनेने (शिंदे गट) १ आणि काँग्रेसने १ जागा जिंकल्या. निवडणूक प्रक्रियेत एकूण ५४७ उमेदवार रिंगणात होते. काही उमेदवार अल्प मतांनी पराभूत झाले, तर काहींचा पराभव मोठ्या फरकाने झाला

निवडणूक प्रचाराचा कालावधी संपताच निवडणूक आचारसंहितेनुसार शहरातील सर्व फलक, झेंडे आणि जाहिरात साहित्य काढून टाकण्यात आले होते. त्यामुळे रस्ते, चौक, उड्डाणपूल, रेल्वे स्थानक परिसर आणि बस थांबे पहिल्यांदाच मोकळे व स्वच्छ दिसू लागले होते. अनेक वर्षांनंतर वसई-विरारकरांना फलकमुक्त शहराचे दर्शन घडले होते मात्र, निकाल जाहीर होताच हे चित्र पुन्हा बदलले. शहरातील प्रमुख चौक, रस्त्यांच्या कडा, आकाशमार्गिका, रेल्वे स्थानक परिसर, बस थांबे तसेच वर्दळीच्या भागांत आभार प्रदर्शनाचे मोठमोठे फलक झळकू लागले आहेत. अनेक ठिकाणी हे फलक दाटीवाटीने लावण्यात आल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून, शहराचे सौंदर्य पुन्हा विद्रुप होत आहे. मुळात शहर स्वच्छ, सुंदर आणि शिस्तबद्ध ठेवण्यासाठी केवळ नागरिकांनीच नव्हे, तर निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनीही जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे.

नागरिकांचा सवाल आहे की, निवडणूक जिंकून आल्यानंतर मतदारांचे आभार मानण्यासाठी फलकबाजी हाच एकमेव मार्ग आहे का? विकासकामे, पारदर्शक कारभार आणि नागरी सुविधांद्वारे आभार व्यक्त करणे अधिक योग्य ठरणार नाही का, असा प्रश्न उपस्थित होत आहे महत्त्वाचे म्हणजे, निवडणूक काळात नियमांची काटेकोर अंमलबजावणी करणारे प्रशासन निकालानंतर मात्र या फलकबाजीकडे दुर्लक्ष करत असल्याचे चित्र दिसत आहे. फलक लावण्यासाठी परवानगी आहे की नाही, सार्वजनिक जागांचा गैरवापर होतो आहे का, याकडे लक्ष दिले जात नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.


## कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती, कल्याण

**मा. शरदचंद्रजी पवार मुख्य बाजार आवार, एन टाईप इमारत,**
**१ ला मजला कल्याण- शिळ रोड कल्याण (प) जि. ठाणे ४२१ ३०१**
**दुरध्वनी क्रमांक (०२५१) २९७०३१६ e mail : apmckalyan@rediffmail.com**

### जाहिर नोटीस

कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती कल्याण, मुख्य बाजार आवारातील विविध विभागातील इमारतीचे तळ मजल्यावरील तसेच पहिल्या मजल्यावर गाळा/ कार्यालय २९ वर्ष मुदती करीता शेती व शेतीपुरक व्यवसायाकरीता भाडे तत्वावर (लिजने) देण्याकरीता उपलब्ध आहे. जाहिर लिलाव (उघड बोलीपध्दतीने) बाजार समितीचे कार्यालयात होणार असुन लिलावाची तारीख, वेळ उपलब्ध गाळयाची संख्या इत्यादी तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | राखिव वर्ग/प्रवर्ग/विभाग | सर्व साधारण वर्ग/ प्रवर्ग/विभाग |
|---|---|---|---|
| १ | फळ व भाजीपाला बाजार - २ "डी टाईप" इमारत पहिला मजला | मागास वर्गीयांकरीता गाळे गाळा नं. ३३ = १ गाळा | - |
| २ | अन्नधान्य बाजार विभाग २ ए/२ पहिला मजला | दिव्यांग व्यक्तीकरीता गाळा क्र. ३५=१ गाळा<br>मागास वर्गीयांकरीता गाळा क्र १८, २२ व ४१ = ३ गाळे | - |
| ३ | सी/१ पहिला मजला | दिव्यांग व्यक्तीकरीता गाळा क्र. १३,३०=२ गाळे<br>मागास वर्गीयां करीता गाळा क्र ४४,४६,४९ = ३ गाळे | |
| ४ | ए/२ तळ मजला | - | गाळा क्र. ३५ व ३६ = २ गाळा |
| ५ | ए/४ पहिला मजला | दिव्यांग व्यक्तीकरीता गाळा क्र. ३८ = १ गाळा | - |
| ६ | बी/५ पहिला मजला | दिव्यांग व्यक्तीकरीता गाळा क्र. ४३=१ गाळा,<br>मागास वर्गीयांकरीता गाळा क्र. ५,१२ व १५ = ३ गाळे | - |
| ७ | बी/६ पहिला मजला | दिव्यांग व्यक्तीकरीता गाळा क्र. १९=१ गाळा<br>मागास वर्गीयांकरीता गाळा क्र. ११ व १५=२ गाळे | - |
| ८ | बी/७ पहिला मजला | दिव्यांग व्यक्तीकरीता गाळा क्र. ३३ = १ गाळा | - |
| ९ | बी/८ पहिला मजला | दिव्यांग व्यक्तीकरीता गाळा क्र. ८ = १ गाळा<br>मागास वर्गीयांकरीता गाळा क्र. ३,४,७,१२,१३ = ५ गाळे | - |
| १० | के टाईप पहिला मजला | दिव्यांग व्यक्तीकरीता गाळा क्र. १०७=१ गाळा<br>मागास वर्गीयांकरीता गाळा क्र. ११७=१ गाळे | - |

सविस्तर निविदा सुचना व अटी शर्ती कार्यालयीन वेळेत समितीचे कार्यालयात पहावयास मिळतील. लिलावात भाग घेण्याकरीता कोरा विहीत नमुना अर्ज बाजार समितीचे कार्यालयात मंगळवार दिनांक २७.१.२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत र.रु. इतर करांसह २२५/- नापरतावा रोखीने भरल्यास मिळतील. सविस्तर निविदा सुचना व अटी-शर्ती महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ पुणे यांचे www.msamb.com या वेबसाईटवर व बाजार समितीचे www.apmckalyan.org या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. तसेच परिपुर्ण भरलेला अर्ज कार्यालयीन वेळेत व लिलावाचे दिवशी मंगळवार दि. २७.०१.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत समितीचे कार्यालयात स्विकारण्यात येतील. तदनंतर आलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

**सही/-**

**सचिव सभापती**
**कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती, कल्याण जि. ठाणे**

**जावक क्रमांक :**
**१) कृऊबास/गाळा वाटप लिलाव/जाहिरात/१८५६/२०२६ दि. २०.०१.२०२६**
**२) कृउबास/जा.प्र.बा./१८६२/२०२६ दि. २१.०१.२०२६**


# पाठींब्याच्या सत्तासमीकरणांची नवी मांडणी
## भविष्यातील राजकीय समीकरणांवर परिणाम करणार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २१**

**ठाणे : कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत घडलेल्या सत्तासमीकरणांनी राज्याच्या राजकारणात नवी चर्चा पेटवली आहे. महायुतीतील शिवसेना (शिंदे गट) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्यात झालेल्या जवळिकीमुळे केवळ स्थानिक राजकारणच नव्हे, तर राज्यस्तरीय युतीधर्म, पक्षनिष्ठा आणि राजकीय नैतिकतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी मनसे-शिवसेना (शिंदे) एकत्र सत्तेत असणार असल्याचे जाहीर करताच, या निर्णयामागील राजकीय गणित आणि त्याचे परिणाम याबाबत चर्चा सुरू झाली आहे.**

कल्याण-डोंबिवली महापालिकेत एकूण १२२ जागांपैकी शिवसेना (शिंदे) गटाकडे ५३, तर भाजपकडे ५० नगरसेवक आहेत. बहुमतासाठी आवश्यक असलेल्या ६२ आकड्यांपासून दोन्ही पक्ष काहीसे दूर आहेत. अशा परिस्थितीत मनसेचे ५ नगरसेवक 'किंगमेकर' ठरले. हीच राजकीय वास्तवता लक्षात घेऊन मनसेने शिंदे गटाला पाठिंबा दिल्याचे स्पष्ट होते.

> **कल्याण-डोंबिवलीतील ही जवळीक केवळ संख्याबळापुरती मर्यादित नसून, ती स्थानिक राजकारणातील अस्थिरता, विकासाची गरज आणि व्यवहार्यतेचे वास्तव अधोरेखित करते. मात्र, या निर्णयामुळे युतीधर्म, पक्षनिष्ठा आणि राजकीय नैतिकतेवरील वाद अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत**

मनसेचे माजी आमदार राजू पाटील यांनी दिलेल्या प्रतिक्रियेतून हा निर्णय भावनिक नसून व्यवहार्य असल्याचे दिसून येते. "केडीएमसीत गेल्या काही दिवसांपासून आकडेमोड, पळवापळवी सुरू होती. समित्यांच्या निवडणुकांत गोंधळ होण्याची शक्यता होती. अशा वेळी स्थिरता आवश्यक होती," असे सांगत त्यांनी पाठिंब्याचे कारण स्पष्ट केले. म्हणजेच, सत्तास्थापनेसाठी नव्हे तर प्रशासनातील अस्थिरता टाळण्यासाठी हा निर्णय घेतल्याचा दावा मनसेकडून केला जात आहे.

महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, सत्तेत सहभागी होऊन मनसेला नेमके काय मिळणार, हा प्रश्न. यावर राजू पाटील यांचे उत्तर राजकीय अपेक्षांपेक्षा स्थानिक वास्तव अधोरेखित करणारे आहे. "आमच्या वॉर्डातील कामे झाली तरी आमच्यासाठी ते पुरेसे आहे," असे सांगत त्यांनी सत्तेचा उपयोग थेट विकासासाठी करण्यावर भर दिला. मात्र, ही भूमिका ठाकरे गटासाठी अस्वस्थ करणारी ठरते. मनसे आणि उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने निवडणूक एकत्र लढवली असताना, नंतर वेगळया आघाडीत जाणे हा केवळ स्थानिक निर्णय मानावा का, हा प्रश्न उपस्थित होतो. यावर राजू पाटील यांनी 'नगरसेवक गायब होण्याचे प्रकार' आणि जनतेचा पळवापळवीला आलेला कंटाळा याचा दाखला देत निर्णयाचे समर्थन केले आहे.

भाजपची प्रतिक्रिया देखील या घडामोडीचे राजकीय महत्त्व अधोरेखित करते. महायुतीत वितुष्ट असल्याचे संकेत यातून मिळतात. मनसे सत्तेत राहून 'कॉमन मिनिमम प्रोग्राम'च्या आधारे काम करणार असल्याचे सांगत असली, तरी या युतीमुळे भविष्यातील राजकीय समीकरणांवर काय परिणाम होईल, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

कल्याण-डोंबिवलीतील ही जवळीक केवळ संख्याबळापुरती मर्यादित नसून, ती स्थानिक राजकारणातील अस्थिरता, विकासाची गरज आणि व्यवहार्यतेचे वास्तव अधोरेखित करते. मात्र, या निर्णयामुळे युतीधर्म, पक्षनिष्ठा आणि राजकीय नैतिकतेवरील वाद अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे ही घडामोड केवळ महापालिकेपुरती न राहता, आगामी राज्य राजकारणाच्या दिशेलाही आकार देणारी ठरू शकते.

# सूचकनाका परिसरातील कचरा प्रश्नावर स्वच्छतेचे आदेश

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण पूर्वेतील सूचकनाका व महात्मा फुले नगर परिसरात साचलेल्या कचऱ्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. रस्त्याच्या कडेला व नाल्यांमधून काढलेला कचरा उचलला जात नसल्याने परिसर अस्वच्छ झाल्याच्या तक्रारी समाजसेवक मनोज वाघमारे यांनी केडीएमसीकडे केल्या होत्या. या तक्रारीची तात्काळ दखल घेत केडीएमसीच्या ४जे प्रभागाच्या सहाय्यक आयुक्त सविता हिले यांनी संबंधित आरोग्य निरीक्षकांना कचरा सफाई व कचरा उचलण्याबाबत त्वरित कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत. मागील आठवड्यात निवडणूक कामकाजामुळे विलंब झाला होता, मात्र आता परिसरात नियमित स्वच्छता केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.



ठाणे ■ गुरुवार
२२ जानेवारी २०२६
दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता

# सुखकर्त्याच्या स्वागतासाठी भक्त सज्ज

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता प्रतिनिधी / ठाणे :** माघी गणेशोत्सवाच्या निमित्ताने ठाणे शहर पुन्हा एकदा गणरायाच्या भक्ती व उत्साहाने न्हाऊन निघणार आहे. गुरुवारपासून सुरू होणाऱ्या माघी गणेशोत्सवात शहरात एकूण १,००६ गणपती बाप्पांचे आगमन होणार असून, यामध्ये १०६ सार्वजनिक व ९०० खासगी घरगुती गणेशमूर्तींचा समावेश आहे. माघी गणेशोत्सवाला विशेष धार्मिक महत्त्व असल्याने शहरातील विविध भागांत भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळणार आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकडून सजावट, आरास, धार्मिक कार्यक्रमांसह सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. उत्सव शांततेत पार पडावा यासाठी प्रशासनाने सुरक्षेच्या उपाययोजना करत पोलिस बंदोबस्त तैनात केला आहे. दरम्यान, ठाणे महापालिकेकडून शहरात विविध ठिकाणी विसर्जनासाठी कृत्रिम तलाव व खाडी घाटांची व्यवस्था करण्यात आली असून, नागरिकांनी पर्यावरणपूरक विसर्जन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. माघी गणेशोत्सवामुळे ठाणे शहरात श्रद्धा, भक्ती आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# सोनुभाऊ बसवंत महाविद्यालयाचा एनएसएस श्रमसंस्कार उपक्रम यशस्वी



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**शहापूर ग्रामीण( नरेंद्र पाटील)-** ज्ञानवर्धिनी संस्था संचलित सोनुभाऊ बसवंत कला व वाणिज्य महाविद्यालयातील 'राष्ट्रीय सेवा योजनेचे' सात दिवसीय श्रमसंस्कार शिबीर संपन्न झाले.

राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाचे असलेले दत्तकगाव काटेकुई (सावरोली) येथे दि. 13 ते 19 जानेवारी दरम्यान हे निवासी शिबीर पार पडले. या शिबिरात जिल्हा समन्वयक डॉ. जीवन विचारे, विभागीय समन्वयक डॉ. राजू रुपवते यांनी आपले विचार मांडले तर माजी विद्यार्थी सुनील वाघमारे, प्राध्यापक सुनील वर्मा यांनी व्यक्तिमत्व विकास या विषयावर व प्राध्यापक डॉ. बाळचंद्र वाकचौरे यांचे आध्यत्मिक जीवनावर व्याख्यान, प्राध्यापक प्रवीण ठाकरे यांनी स्पर्धा परीक्षा विषयावर मार्गदर्शन केले तसेच पतंजली योगा केंद्राचे अब्दुल शेख यांनी योगा आसनांचे प्रात्यक्षिक करून माहिती दिली. माजी विद्यार्थी कृणाल जाधव, राहुल घायवट यांनी पथनाट्य विषयी माहिती देत मार्गदर्शन केले. माजी विद्यार्थी अभिनेता अभय पितांबरे यांनी स्वयंसेवकांना अभिनयाची कला शिकवली. भूषण विशे यांनी साहशी खेळ या विषयावर माहिती देत प्रात्यक्षिक सादर केले.

सहभागी स्वयंसेवकांनी गांव -परिसरात स्वच्छता मोहीम राबवून येथील वृक्षांना गेरू, चुना लावून रंगरंगोटी केली. तसेच जिल्हा परिषद केंद्र शाळा खातिवली येथील शिक्षक व विद्यार्थी यांच्या माध्यमातून माऊली किल्याच्या पायथ्याशी वनराई बंधारा बांधण्यात आला. याबरोबरच या शिबिरावेळी के.बी.हाजी. बच्चूअली धर्मादाय नेत्र रुग्णालय व जे.एस.डब्लू फाउंडेशनच्या वतीने आयोजित डॉ.रघुनाथ हाडोबा, वनश्री भालके, प्रतीक्षा निमसे यांनी नेत्र तपासणी करून संबंधित रुग्णांना मार्गदर्शन केले. या शिबिरात 56 विद्यार्थी स्वयंसेवकांनी सहभाग घेतला होता.

या शिबिराप्रसंगी संस्थेचे सचिव दिलीप भोपतराव, उपाध्यक्ष शेखर आधिकारी, महाविद्यालय प्राचार्य डॉ. अनिल सिंह, उपप्राचार्य डॉ. संतोष गायकवाड, प्राध्यापक डॉ. गौतम सोनवणे, कार्यालयीन अधीक्षक सुनील दिवाण, जि.प. शाळा काटेकुई मुख्याध्यापक नामदेव पाटेकर आदीजण उपस्थित होते. तर यासाठी कार्यक्रम आधिकारी डॉ. राजू शनवार, प्राध्यापक संजय तडवी, प्राध्यापिका डॉ.अश्विनी ओव्हाळ यांनी परिश्रम घेतले होते.

# वसंत शंकर घरत यांचे दुःखद निधन



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**पेण :** पेण तालुक्यातील डावरे येथील निवृत्त पोलिस असिस्टंट इन्स्पेक्टर वसंत शंकर घरत यांचे वयाच्या ८० व्या वर्षी २०/०१/२०२६ रोजी रात्री निधन झाले. एक मनमिळाऊ,शांत स्वभावाचे होते,पोलिस खात्यात त्यांना बापू या नावाने संबोधित होते,वयाच्या १८ व्या वर्षी आपल्या सेवेची सुरुवात केली, एकूण ४० वर्ष पोलिस खात्यात त्यांनी आपले योगदान दिले .अलिबाग ,उरण, पनवेल,कळंबोली, ठाणे येथे आपली प्रदीर्घ सेवा करून निवृत झाले,त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले सुना,तीन मुली, नातवंडे जावई,असा मोठा परिवार आहे

# भिवंडीत ज्येष्ठ नागरिक संघाचा वर्धापन दिन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**भिवंडी :** भिवंडी शहरात सामाजिक कार्यात सक्रिय असलेल्या ज्येष्ठ नागरिक संघ भिवंडी (सेंट्रल) यांचा १७ वा वर्धापन दिन सोहळा कोंबडपाडा येथील पार्वती मंगल कार्यालयात मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रम पालिकेचे माजी नगरसेवक महेंद्र देहरकर यांच्या अध्यक्षतेखाली झाला. प्रमुख पाहुणे म्हणून शेलार गावचे माजी सरपंच घनश्याम भोईर, आय.डब्ल्यू.सी. फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रभाकर जाधव व सामाजिक कार्यकर्ते अरुण जाधव उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष सदानंद पिंपळे, जयंत सोनटक्के, सुरेखा मुंढे, सुभाष खिस्मतराव, सहसचिव श्रीपत तांबे आदी मान्यवर व्यासपीठावर होते.

यावेळी केंद्र व राज्य शासनाच्या ज्येष्ठ नागरिकांसाठीच्या विविध योजनांची माहिती देत, त्या योजनांचा लाभ सर्व सदस्यांना मिळवून देण्यासाठी संघाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन प्रभाकर जाधव यांनी केले. कार्यक्रमात नंदकुमार महादेव पुण्यार्थी व लक्ष्मीबाई मोतीराम ठाकरे यांना 'ज्येष्ठ नागरिक जीवन गौरव' पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच विवाहास ५० वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरिकांचा व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

ज्येष्ठ नागरिकांच्या मनोरंजनासाठी आदर्श कला मंच यांच्या वतीने मराठी व हिंदी गाण्यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी नवनिर्वाचित नगरसेविका रोमा निलेश आळशी व नगरसेवक ॲड. वैभव भोईर यांचा गौरव करण्यात आला. पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# भुवन शाळेच्या मुलींची जिल्ह्यात बाजी

## लंगडी खेळात पटकावला प्रथम क्रमांक

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**मुरबाड :** भुवन शाळेच्या खेळाडूंनी लंगडी स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. सरळगाव शैक्षणिक तालुक्यातील भुवन, माल्हेड, नागाव, संगम आणि वडवली या पाच केंद्रांच्या खेळाडूंमध्ये झालेल्या क्रीडा स्पर्धेत भुवन शाळेच्या




विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट खेळ करत आपले कौशल्य सादर केले. लंगडी मुलींच्या संघाने दिलेल्या अप्रतिम खेळीचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांच्या या भन्नाट कामगिरीमुळे भुवन ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षक वर्गाचे अभिनंदन केले आहे. शाळेचे मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक दिलीप खाटेघरे गुरुजी आणि सहकारी शिक्षिका जयश्री शेलवले, रेखा पाटील आणि रंजना डोहळे यांनी विद्यार्थ्यांना उत्कृष्ट मार्गदर्शन केले.भुवन शाळेने तालुकास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर शाळेच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट प्रदर्शन केले आहे.

# रिक्षा पासिंग विलंब प्रकरणी दंड नाही : उप प्रादेशिक परिवहन अधिकारी

## शिवशांती प्रतिष्ठानमुळे रिक्षा चालकांना मिळाला दिलासा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**ठाणे :** शहरातील नागरिकांचे जीवन हे प्रवाशी वाहतूक करणाऱ्या रिक्षांवर अवलंबून असते. त्यामुळे प्रत्येक रिक्षा चालकांनी रिक्षाची पासिंग प्रक्रिया वेळेत करणे गरज आहे. तसे नाही केले तर अशा रिक्षांवर दंडात्मक कारवाई केली जाते. प्रशासनिक कारणांमुळे रिक्षांच्या फिटनेस किंवा पासिंग प्रक्रियेत विलंब होत असल्यास, ज्या रिक्षांची पासिंग तारीख सध्या चालू कालावधीत आहे, त्यांच्यावर कोणतीही दंडात्मक कारवाई (पेनल्टी) केली जाणार नाही.मात्र, गेल्या २ ते ४ वर्षांपासून किंवा त्याहून अधिक काळ पासिंग न केलेल्या रिक्षा चालकांना या निर्णयाचा लाभ मिळणार नाही. हा निर्णय केवळ सध्याच्या कालावधीत पासिंग असलेल्या चालकांसाठीच लागू राहणार आहे. असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी रोहित काटकर यांनी रिक्षा चालकांच्या विविध समस्यांबाबत चर्चा करताना आश्वासन दिले दिले.

शिवशांती प्रतिष्ठान व शिव परिवारचे संस्थापक ॲड. विनय कुमार सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली शिवशांती प्रतिष्ठान व शिव परिवार रिक्षा टॅक्सी चालक कल्याण समितीच्या पुढाकारातून रिक्षा चालकांच्या विविध समस्यांबाबत



प्रशासनाशी दि.21 जानेवारी 2026 रोजी निवेदन देऊन सखोल चर्चा करण्यात आली. यामध्ये शहरातील रिक्षा चालक बांधवांना मोठा दिलासा देणारा निर्णय प्रशासनाकडून जाहीर करण्यात आला आहे.

यावेळी शहर वाहतुक विभागाचे पोलीस उपायुक्त पंकज शिरसाठ यांनी सांगितले की, फिटनेसच्या नावाखाली सामान्यतः पेनल्टी आकारली जात नाही. तसेच कुठे नियमबाह्य कारवाई होत असल्यास त्यामध्ये तातडीने सुधारणा करण्यात येईल. जनहित व समाजोपयोगी उपक्रमांमध्ये ट्रॅफिक पोलीस विभाग नेहमी सहकार्याची भूमिका घेईल. रिक्षा चालकांची रोजीरोटी, न्याय आणि सुव्यवस्था यांचा विचार करून प्रशासनाने ही सकारात्मक भूमिका घेतल्याने चालक वर्गात समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# रेणुका विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी/अंबाडी :** भिवंडी तालुक्यातील वज्रेश्वरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित रेणुका विद्यालय झिडकेच्या सन १९८१–८२ या इयत्ता दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचे वार्षिक स्नेहसंमेलन यंदाही उत्साहात पार पडले. हे स्नेहसंमेलन रविवार दि. १८ जानेवारी २०२६ रोजी अंबाडीगाव येथील यशश्री रिसॉर्ट येथे सकाळी १० ते सायंकाळी



५ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले होते.

सुमारे ४५ वर्षांनंतरही शालेय जीवनातील आठवणी ताज्या ठेवत मित्रपरिवारातील स्नेहबंध दृढ करणे, एकमेकांच्या कौटुंबिक व सामाजिक वाटचालीची माहिती जाणून घेणे हा या स्नेहसंमेलनाचा मुख्य उद्देश होता. यावेळी गणित व विज्ञान विषयाचे सेवानिवृत्त आदर्श शिक्षक एम. टी. गुळवे सर, त्यांची सहचारिणी शकुंतला गुळवेबाई व विकास नेहेते हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. गुरूजनांच्या मार्गदर्शनामुळेच आजचे यश मिळाल्याची भावना माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमात दिवंगत गुरुजन व मित्रमैत्रिणींना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी कुटुंबासह आपली ओळख करून देत मनोगते व्यक्त केली. स्नेहभोजन, खेळ व विविध उपक्रमांनी कार्यक्रम अधिक रंगतदार झाला. प्रास्ताविक भारती पाटील यांनी तर सूत्रसंचालन विजय गायकवाड यांनी केले. मंगेश पाटील, काथोड पाटील, मारुती पाटील आदींसह क्लास फ्रेंड्स ग्रुपचे प्रमुख राजू पाटील यांच्या मार्गदर्शनामुळे हे स्नेहसंमेलन यशस्वीरीत्या पार पडले.

# रिलायबल अकॅडमी तर्फे यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**कल्याण :** महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक रेल्वे एसएससी, यासारख्या स्पर्धा परीक्षेमध्ये यश मिळवलेल्या अनेक यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा रिलायबल अकॅडमी ठाणे द्वारे पार पडला. मनोहर पाटील संचलित रिलायबल अकॅडमीच्या माध्यमातून अनेक विशेष व गुणवंत विद्यार्थी विविध पदावर निवडले गेले होते. अकॅडमी तर्फे ठाणे येथे त्यांच्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पालक विद्यार्थी व विविध क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती उपस्थित होते.याप्रसंगी अनेक यशस्वी विद्यार्थ्यांनी आपली मनोगत व्यक्त केली. यश मिळवण्यासाठी आवश्यक



असणाऱ्या बाबींची कशाप्रकारे काळजी घ्यावी. तसेच सध्या अस्तित्वात असलेली समाज माध्यमे हे यशापासून आपल्याला दूर कशी नेतात अशा अनेक बाबीतून स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना नवनिर्वाचित यशस्वी उमेदवारांनी आपल्या मनोगतातून प्रेरणा निर्माण केली. या सत्कार प्रसंगी पोलीस उपनिरीक्षक भरत मार्कड, रिलायबल अकॅडमीचे संस्थापक मनोहर पाटील, संचालक संदीप पाटील व सर्व शिक्षक, पाहुणे मार्गदर्शक, व मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी व पालकांची उपस्थिती होती.या यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये प्रोबेशनरी ऑफिसर भावेश तोरावने, विक्रीकर निरीक्षक राहुल शेलार, लिपिक पदी योगेश साबळे, कविता शर्मा, निलेश भामरे, विराज बोराडे, विशाल वरघडे तसेच आरोग्य सेवक पदी प्रशांत निकम यांची निवड झाली आहे.

# मुंबई विद्यापीठाच्या क्रॉस कंट्री टूर्नामेंटच यशस्वी आयोजन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**कल्याण :** स्पर्धा या विद्यार्थ्यांच्या शारीरिक क्षमता आणि संघ भावनेला प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित केल्या जातात आणि या स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपल्यातलं कौशल्य आणि नेतृत्व सिद्ध करण्याची संधी यातून मिळत असते. जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे सोमवारी मुंबई विद्यापीठ आंतरविभागीय क्रॉस कंट्री टूर्नामेंट अंतर्गत डॉ.मनोज रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आलं होतं. ही स्पर्धा केवळ धावण्यापूर्ती मर्यादित नसून संयम आत्मविश्वास आणि कठोर परिश्रमाची कसोटी होती.

मुंबई विद्यापीठ क्रीडा क्षेत्रात सातत्याने प्रगती करत असून भविष्यातील राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय



स्तरावरील खेळाडू घडवण्याचा विद्यापीठाचा संकल्प आहे. मुंबई विद्यापीठाच्या या स्पर्धेमध्ये विविध झोन सहभागी झाले होते ज्यामध्ये जवळपास 50 विद्यार्थी ज्यापैकी 24 मुली आणि 26 मुले होती. यावेळेस प्रमुख पाहुणे म्हणून निवड समितीचे डॉ. यज्ञेश्वर बागराव, शशांक उपाशेटे, रवींद्र कुमार सिंग, रामचंद्र कदम उपस्थित होते. यावेळेस डॉ. बागराव यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर करत विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या संपूर्ण आराखड्याबद्दल मार्गदर्शन केलं.

या स्पर्धेमध्ये मुलांमध्ये प्रथम क्रमांक सुरज झोरे, द्वितीय क्रमांक स्वराज जोशी तृतीय क्रमांक संदीप जोशी तर मुलींमध्ये प्रथम क्रमांक आदिती पाटील द्वितीय क्रमांक खुशबू बघेल तृतीय क्रमांक काजल प्रजापती यांनी पटकावला. तर या स्पर्धेची मुलांमध्ये प्रथम चॅम्पियन टीम मुंबई शहर, द्वितीय कोकण झोन आणि तृतीय ठाणे झोन तर मुलींमध्ये प्रथम चॅम्पियनशिप मिळवणारी टीम ठाणे झोन द्वितीय मुंबई उपनगर तर तृतीय कोकण विभाग ठरली. या सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचं पारितोषिक देऊन कौतुक करण्यात आलं. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा सतीश लकडे यांनी केले. यावेळेस जीवनदीप महाविद्यालयाचे संचालक प्रशांत घोडविंदे, प्राचार्य अशोक वाघ, उप प्राचार्य हरेंद्र सोष्टे, क्रीडा विभाग प्रमुख मोहनीश देशमुख यांचे सहकार्य लाभले. तसेच आंतरविभागीय समन्वयक संगीता गोरे, हर्षद पाटील, अक्षय टेंभे, अक्षय वाडकर, कल्पेश बोटके, जीवनदीप महाविद्यालयाचे सर्व शिक्षक वृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# खडवली रस्त्यावरील ५ फुटी अजगराला पकडण्यात सर्पमित्रांना यश



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**पडघा :** भिवंडी तालुक्यातील सुंदरवन सहकारी सोसायटी जवळील पडघा - खडवली रस्त्यावर आढळलेल्या ५ फुटी अजगराला पकडण्यात सर्पमित्रांना यश आल्याने नागरीकांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे.

मंगळवारी रात्रीच्या सुमारास सुंदरवन सहकारी संस्थेच्या कंपाऊंड जवळ पडघा खडवली रस्त्यावर ५ फूट लांबीचा भला मोठा अजगर नागरीकांना आढळल्याने परिसरातील घबराट पसरली होती. तसेच पडघा खडवली रस्त्यावर दीवस रात्र सतत वाहनांची वर्दळ असल्याने एखाद्या वाहनाखाली अजगर चिरडून मृत्यू होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. त्यामुळे अजगराचा जिव वाचावा यासाठी नागरीकांनी परिसरातील सर्पमित्र मयूर बजागे,रवि दांडगे, सागर बजागे यांना पाचारण केले होते.सर्पमित्रांनी मोठ्या शिताफीने या भल्या मोठ्या अजगराला सुरक्षितरीत्या पकडुन पडघा वनपरिक्षेत्र अधिकारी रमेश रसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली वनकर्मचारी यांच्या उपस्थितीत जंगलातील सुरक्षित स्थळी सोडुन देण्यात आले. थंडीचे दीवस असल्याने उबेच्या व भक्ष्याच्या शोधात साप मानवी वस्तीत शिरतात साप दिसताच नागरीकांनी घाबरून न जाता सर्पमित्रांना पाचारण करावे असे आवाहन सर्पमित्र मयूर बजागे, रवी दांडगे यांनी केले आहे.

# प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजवंदन व रक्तदान शिबीराचे आयोजन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**/मनोर (प्रतिनिधी)- आदिवासी एकता मित्र मंडळ व शिवध्येय अकॅडमी यांच्या वतीने आयोजित तसेच कच्छ युवक संघ यांच्या सहकार्याने बिरसायत भवन, मनोर येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजवंदन व रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

सोमवार दि. 26 जानेवारी रोजी संपूर्ण भारत देशात प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा होत आहे. या अनुषंगाने आदिवासी एकता मित्र मंडळ व शिवध्येय अकॅडमी यांच्या वतीने ध्वजवंदन साजरा होत आहे. तसेच यावेळी कच्छ युवक संघ यांच्या सहकार्याने येथे रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले असून सदर, ध्वजवंदन सामाजिक कार्यकर्ते सुरेश जगू खांडेकर यांच्या हस्ते पार पडणार असल्याचे आदिवासी एकता मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष संतोषजी जनाठे यांनी म्हटले आहे.

दरम्यान, या आयोजित कार्यक्रमात सर्व नागरीक व रक्तदाते यांनी सहभाग घ्यावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024